समग्र प्रकाशन

# महाराष्ट्र दिनमान

www.maharashtradinman.com

शनिवार, ०३ नोव्हेंबर २०१८ वर्ष १८ । अंक : २१६ MaharashtraDinman.Blogspot.com पाने : ८ । रु. : ३.०० • मुंबई । ठाणे । पालघर । रायगड तुमच्यासाठी... तुम

## शिवकृपा पतपेढीला सहकार भूषण पुरस्कार

■ मुंबई । प्रतिनिधी



राज्याच्या सहकार क्षेत्रात दिपस्तंभाप्रमाणे उत्कृष्ट काम करीत असलेल्या शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई या संस्थेला सन २०१६-१७ या वर्षीचा महाराष्ट्र शासनाचा सहकार भूषण हा अत्यंत मानाचा पुरस्कार राज्याचे सहकार मंत्री सुभाष देशमुख व राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर, यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी आमदार ॲड. आशिष शेलार, आमदार प्रविण दरेकर, सहकार विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला आणि सहकार आयुक्त सतीश सोनी उपस्थित होते.

याप्रसंगी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष कृष्णा शेलार, उपाध्यक्ष वसंत खा. चव्हाण, संस्थापक संचालक चंद्रकांत श्री. वंजारी माजी अध्यक्ष अविनाश ता. भोसले आदि मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीत गुणात्मकदृष्टया प्रथम क्रमांकावर असेलेली आणि गेली ३६ वर्षे राज्यातील सहकार क्षेत्रात दिपस्तंभासारखी आदर्शवत काम करीत असलेल्या शिवकृपा पतपेढीचे संपूर्ण महाराष्ट्रात कार्यक्षेत्र असून एकूण ८७ शाखा, ७ विभागीय कार्यालये व ठाणे येथे सुसज्ज असे प्रशस्त प्रशासकीय कार्यालय आहे.